# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५१५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१७/०८/२०१६

**१) जबरीने चोरी करुन जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक १६/०८/२०१६ रोजी १४.०० वा. दर. यातील फिर्यादी राजेश पुंडलीक टिचकुले वय ३६ वर्ष, रा. रोहणा याने आपली टाटा सुमो सवारी गाडी क्र. एमएच २१ सी ०५१७ ही उभी करुन सवारीची वाट पाहत असतांना यातील आरोपी हा त्याचे जवळ येवुन दारु पिण्यास पैसे मागु लागला परंतु फिर्यादीने पैसे देण्यास नकार दिल्याने आरोपीने त्याचे कॉलर पकडुन शर्टचा वरचा खिसा जोरात ओढुन फाडला व ६,००/—रु. जबरी चोरुन घेवुन गेला व पोलीसात रिपोर्ट देशील तर जिवाने ठार मारीन अशी धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३९२,५०६(ब) भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक १६/०८/२०१६ रोजी १२.०० वा. दर. यातील फिर्यादी जितेन्द्र तानुजी वासनिक वय ४५ वर्ष, रा. चपराड याने आपली मोटार सायकल क्र. एमएच ३६ क्यु ११८३ हिरो स्प्लेन्डर कि. २०,०००/—रु. ची ही पशु वैद्यकिय कार्यालय पालांदुर येथे ठेवुन कार्यालयात कामांनी गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण मोटार सायकल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. ढोक पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन मारहान केली व जिवाने मारण्याची धमकी दिली . :—**

दिनांक १५/०८/२०१६ रोजी २१.३० वा. दर. यातील फिर्यादी राजकिरण वसंता ठवकर वय ३२ वर्ष, रा. गुंथारा हा दुर्गा मंदीर येथील पाय—यावर बसला असता यातील आरोपी क्र. १ यास मंदीरा समोरुन जातांनी पाहुन त्यास तु सकाळी संदीप गोमासेला कशाला मारपीट केले असे हटकले असता तो तुझा रिस्तेदार लागतो का असे म्हणुन भांडण करुन लोखंडी वस्तुने फिर्यादीचे डावे डोळयाचे भुवईवर मारुन जखमी केले व आरोपी क्र. २ व ३ नी फिर्यादीचे आईला शिविगाळ करुन डोक्याचे केस पकडुन ओढत आणुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. सतांपे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक १७/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहनांकरीता ०६ तिन सिटर वाहनांवरती १९ केसेस व इतर वाहनांवरती १०० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(श्री.एस. टी. घुसर)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह) भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५६११९१९

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.